भास्कर सावे : नैसर्गिक शेतीचे गांधीजी

Bharat Mansata

नैसर्गिक शेतीचे गांधीजी म्हणून ओळखले जाणाऱ्या स्व. भास्कर सावे यांनी सेंद्रिय शेती करणाऱ्या तीन पिढ्यांना प्रेरणा दिली आहे आणि मार्गदर्शनही केले आहे. शेती करण्याची पद्धती आणि त्यांची शिकवण यांची मुळे ही माणसाचे निसर्गाबरोबरचे असलेले सहजीवन याबद्दलच्या त्यांच्या सखोल जाणिवेतून आले होते आणि ज्या कुणाला रस असेल त्याला हे ज्ञान मुक्तपणे (आणि तरीही अत्यंत उत्साहाने) देण्यात त्यांना मनापासून आनंद वाटत असे. २०१० मध्ये इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ ऑरगॅनिक अग्रिकल्चर मुव्हमेंटसने (आयफोम) - (नैसर्गिक शेतकऱ्यांची आणि चळवळींची जागतिक पालक संघटना) सावे यांना 'वन वर्ल्ड अवार्ड फॉर लाइफटाइम अचिव्हमेंट' या पुरस्काराने सन्मानित केले होते.

'कल्पवृक्ष' ही भास्कर सावे यांची १४ एकरातील फळबाग ही दक्षिण गुजरातमधील किनारपट्टीवर असलेल्या वलसाड जिल्ह्यातील देहरी गावानजीक आहे. समुद्रकिनारी महामार्गाला लागून असलेल्या या बागेत १० एकरांच्या परिसरात त्यांनी नारळ आणि चिकू (सपोता) यांच्यासह इतर काही फळझाडे लावली आहेत. सुमारे दोन एकरात पारंपारिक पीकबदल पद्धतीने मोसमी पिकांची सेंद्रिय शेती केली जाते. दुसऱ्या २ एकरात नारळ रोपवाटिका आहे, ज्याची मागणी खूप आहे. या शेतीतून मिळणारे सगळ्या प्रकारचे उत्पन्न हे, एकूण उत्पादन, पोषणमूल्य, चव, जैवविविधता, पर्यावरणीय शाश्वतता, जलसंवर्धन, ऊर्जावापर आणि आर्थिक नफा, अशा सर्व निकषांच्या आधारे रासायनिक खते वापरणाऱ्या कोणत्याही शेतापेक्षा अधिक चांगले आहे, तर त्यासाठी लागणारा खर्च (मुख्यत्वे कापणीसाठी लागणारे मजूर) हा किमान आहे आणि शेतीत टाकाव्या लागणाऱ्या बाह्य घटकांचा खर्च तर शून्यच आहे.

कल्पवृक्षमधील नैसर्गिक समृद्धी

भास्कर सावे यांच्या शेतात प्रवेशद्वारापासून सुमारे २० पावले अंतर चालत गेल्यावर एक फलक लागलेला दिसतो. 'सहकार्य हा निसर्गाचा मूलभूत नियम आहे' - हे वाक्य म्हणजे नैसर्गिक शेतीचे तत्त्वज्ञान आणि वापर यांची अगदी सोपी आणि संक्षिप्त ओळख आहे. शेतात आणखी आत गेल्यावर अशी छोटी पण विचार करण्यास प्रवृत्त करणारी आणि लक्ष वेधून घेणारी अनेक सूत्रे आपल्याला जागोजागी वाचायला मिळतात. अत्यंत थोड्या शब्दात मोठा आशय मांडणाऱ्या या विचारसूत्रांमध्ये निसर्ग, शेती, आरोग्य, संस्कृती आणि अध्यात्माचे अगदी गाळीव ज्ञान ओतप्रोत भरले आहे आणि हे ज्ञान भास्करभाईंनी अनेक वर्षांच्या श्रमातून मिळविले आहे. अगदी त्यांच्या प्रचंड प्रमाणात येणाऱ्या पिकांप्रमाणेच! रसायने वापरून केल्या जाणाऱ्या कोणत्याही आधुनिक शेतीला मात देऊ शकेल असे उत्पादन कल्पवृक्षमध्ये घेतले जाते आणि ही अत्यंत लक्षवेधक बाब आहे आणि वर्षाच्या कोणत्याही काळात, नेहमीच दिसून येते. त्यांच्या येथील एका नारळाच्या झाडाला येणारी फळे हे कदाचित देशातील सर्वाधिक उत्पन्न असावे. काही झाडांना वर्षाकाठी ४०० नारळे आणि सरासरी जरी बघितली तरी ती ३५० नारळांची आहे. सुमारे ४५ वर्षे किंवा त्यापेक्षा जुन्या असलेल्या चिकूच्या झाडांनाही अशीच प्रचंड प्रमाणात फळे लागतात आणि वर्षाकाठी प्रत्येक झाडापासून ३०० किलोग्रॅम गोड फळांचे उत्पन्न मिळते.

याशिवाय, इतर फळझाडांमध्ये केळी, पपई, सुपारी, आंबा, फणस, ताडी, सीताफळ, जांभूळ, पेरू, डाळिंब, लिंबू, मोसंबी, मोह, चिंच, कडुलिंब, औदुंबर या फळझाडांशिवाय, बांबू आणि कढीपत्ता, क्रोटॉन्स, तुळस, मिरे, विड्याची पाने, पॅशनफ्रुट अशी झाडे येथे उभी आहेत.

नवाबी कोलम हे तांदळाचे उंच, चविष्ट आणि जास्त उत्पन्न देणारे वाण, विविध प्रकारच्या डाळी, हिवाळ्यातील गहू आणि इतर भाजीपाला व कंदपीके देखील दोन एकर जागेत त्या त्या मोसमानुसार घेतली जातात. यातून त्यांचे स्वत:चे कुटुंब आणि पाहुणेरावळे यांच्याकरिता लागणारे पुरेसे उत्पन्न त्यांना मिळते. बहुतेक दरवर्षी तांदळाचे अतिरिक्त उत्पन्न होते, जे नातेवाईक किंवा मित्रांना भेट म्हणून दिले जाते आणि ते देखील या तांदळाची चव आणि दर्जा याला मनापासून दाद देतात.

भास्कर सावे यांच्या शेतातील विविध पिके ही मिश्र आणि एकजीव समुहाप्रमाणे वाढतात. संपूर्ण शेतात ऊन, पाऊस किंवा वारा सहन करणारा



नारळाची रोपे काढताना सावे.

जमिनीचा मोकळा तुकडा क्वचितच बघायला मिळतो. चिकूच्या झाडाखाली गडद सावली व गळलेल्या पानांनी झालेले आच्छादन दाट असते तर चुकून ज्या ठिकाणी सूर्यकिरण पोहोचतात तेथे तृण डोके काढताना दिसते. उन्हाळ्यातील गरम दिवसांमध्ये, झाडांपासून मिळणारी सावली किंवा साठलेला पानांचा सडा यामुळे जमिनीचा पृष्ठभाग थंड आणि ओलसर राहतो. हिवाळ्यातील थंड रात्रींमध्ये, जमिनीवरील हे आच्छादन हे दिवसभर मिळालेली ऊब सांभाळून ठेवणाऱ्या गोधडीसारखे काम करते. दाट झाडांच्या आच्छादनामुळे दमटपणाही जास्त राहतो आणि बाष्पीभवन कमी होते. त्याचा परिणाम म्हणून सिंचनाची गरज फारच कमी पडते. अशा वातावरण अने लहान कीटक मित्र आणि सूक्ष्मजीव नांदू शकतात.

दहा एकरांच्या या फळबागेत सातत्याने दरवर्षी १५ हजार किलोचे उत्पादन मिळते. (मागील १५ ते २० वर्षात या परिसरात झालेल्या औद्योगिक प्रदूषणामुळे हे उत्पन्न घसरले आहे.) पंजाब, हरयाणा आणि देशाच्या इतर भागांमध्ये ज्या पद्धतीने बाहेरून अनेक विषारी रसायने वापरून अन्न पिकवले जाते त्यापेक्षा कितीतरी जास्त पोषणमूल्य या नैसर्गिक शेतीतील उत्पादनातून मिळते.

निसर्गाची मशागत आणि सुपीकता निर्माण

चार्ल्स डार्विनने सुमारे एक शतकापूर्वी हे सांगितले होते आणि त्याला निश्चित कारणही होते: जागतिक इतिहासात गांडुळांनी जी भूमिका बजावली आहे तशी भूमिका इतर कोणा जीवाने बजावली असेल किंवा नाही याबाबत शंका आहे. भास्कर सावेही याला दुजोरा देतात. ''गांडुळांच्या आणि जमिनींची मशागत करणाऱ्या इतर अशाच जीवांच्या नैसर्गिक निर्मितीला जो शेतकरी मदत करतो, तो निश्चितपणे समृद्धीची वाटचाल करीत असतो.'' जमिनीची मशागत करणाऱ्या इतर जीवांमध्ये मुंग्या, वाळवी आणि इतर अनेक प्रजातींचा समावेश आहे. जमिनीची प्रत सुधारणे आणि झाडांच्या पोषणमूल्यांचे पुनर्चक्रीकरण यांनाही ते मदत करतात; कल्पवृक्षसारख्या नैसर्गिक शेताच्या प्रत्येक चौरस फुटात असे मदत करणारे असंख्य जीव आहेत. याच्या अगदी उलट, आधुनिक शेतीच्या पद्धतीमुळे मातीचे सेंद्रिय आयुष्य धोक्यात आले आहे. जमिनीची नैसर्गिक सुपीकता नष्ट करून आपण अधिकाधिक बाह्य घटकांची आणि अनावश्यक मजुरीची गरज निर्माण करतो आणि त्यातून मिळणारे उत्पादन हे तुलनेने कमी दर्जाचे आणि जास्त खर्चिक असते. जिवंत जमीन हा एक सेंद्रिय घटक आहे आणि जगण्याचे हे संपूर्ण जाळे आपण जपले पाहिजे आणि त्याचे रक्षण केले पाहिजे. नैसर्गिक शेती हा एक मार्ग आहे, भास्कर सावे आपला मुद्दा मांडतात.

तण हे मित्र

आपली जीवसंस्था चालावी म्हणून निसर्गातील प्रत्येक लहान घटक आणि वनस्पती काही ना काही भूमिका बजावत असतो. प्रत्येक घटक हा अन्नसाखळीचा अविभाज्य भाग आहे.

शेतामध्ये मोठ्या प्रमाणात येणाऱ्या तणावर समूळ उपचार करण्याचा दूरगामी उपाय म्हणजे मिश्र पिके आणि पीकबदल पद्धतीचा वापर करणे आहे. त्याचबरोबर रसायनांचा वापर आणि खोलवर मशागत करणे थांबविले पाहिजे. जमिनीची प्रत सुधारल्यानंतर अडचणीचे ठरणारे तण आपोआप नष्ट होईल किंवा प्रत वाढण्याच्या दरम्यानच्या काळात खाद्यपिकांपेक्षा जास्त



गळलेल्या पानामुळे नैसर्गीक आच्छादन तयार होते

फोफावू शकतात. याचे व्यवस्थापन करण्याचा उपाय म्हणून हे तण नियमितपणे कापत राहावे (त्यांना फुलोरा येण्याआधी) आणि त्यानंतर त्यांना पिकांखाली जमिनीवर तीन ते चार उंच जाडीचा थर करून आंथरावे. जमिनीत गाडलेल्या तणबीजांना सूर्यप्रकाश न मिळाल्याने त्यांची नव्याने होणारी वाढ बऱ्याच प्रमाणात नियंत्रित करता येईल.

शेतकरी जेव्हा पुन्हा सेंद्रीय शेतीकडे वळतील तेव्हा जमिनीची प्रत दरवर्षी उंचावत जाईल. त्याच जोडीने पिकांची वाढ चांगली होत जाईल, आणि तणांची वाढ कमी होईल. केवळ २-३ वर्षात, तण काढण्याची कोणतीच गरज भासणार नाही. तोपर्यंत शेतकऱ्यांनी तण काढणे आणि ते जमिनीवर पसरून ठेवणे सुरू ठेवावे.

निसर्गाबरोबर सुसंवाद साधून शेती करण्याची तत्त्वे

सेंद्रीय शेतीची चार मूलभूत तत्त्वे ही अत्यंत सोपी आहेत! भास्कर सावे सांगतात. ''पहिले म्हणजे, सर्व जीवांना जगण्याचा समान अधिकार आहे. या अधिकाराचा मान राखायचा तर शेती ही अहिंसक असली पाहिजे.''

दुसरे तत्त्व हे सांगते की निसर्गातील प्रत्येक गोष्ट उपयोगाची आहे आणि आयुष्याच्या चक्रात तिचा एक उद्देश आहे.

तिसरे तत्त्व असे आहे: शेती हा धर्म आहे, निसर्गाची आणि इतर जीवांची सेवा करण्याचा पवित्र मार्ग; त्याचे केवळ धंदा किंवा पैसा कमविण्याचा व्यवसाय या दर्जापर्यंत स्खलन होऊ देऊ नये. निसर्गाचे नियम झिडकारून केवळ जास्त पैसे कमविण्याची लोभी वृत्ती ही सतत वाढणाऱ्या आणि आपण तोंड देत असलेल्या प्रश्नांचे मूळ आहे.

वर्षभर सुपीकता निर्माण करत राहणे हे चौथे तत्त्व आहे. या तत्त्वानुसार माणसांचा केवळ फळे आणि पिकांची बीजे यांवरच हक्क आहे. झाडांपासून तयार होणाऱ्या बायोमासचा हा ५ ते १५ टक्के भाग आहे. उर्वरित ८५ ते ९५ टक्के बायोमास हे पिकांच्या अवशेषांचे असते हे जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी जमिनीत परत जायला हवे. आच्छादन म्हणून किंवा शेतातील प्राण्यांचे खत म्हणून. जर अत्यंत काटेकोरपणे याचे पालन केले तर शेताबाहेरील कोणत्याही घटकाची गरज भासणार नाही आणि जमिनीची सुपीकताही कमी होणार नाही.

जमिनीच्या पृष्ठभागाच्यावर तण कापून घेणे (मुळांना कोणताही धक्का न लागता) आणि त्यांना जमिनीवर आंथरून ठेवणे, यामुळे जमिनीचा अनेक प्रकारे लाभ होतो. मल्चिंगच्या या प्रक्रियेमुळे वारा किंवा पावसामुळे जमिनीची धूप कमी होते, जमीन घट्ट होण्याचे प्रमाण कमी होते, बाष्पीभवनात घट होते आणि त्यामुळे सिंचनाची गरजही कमी होते व जमिनीत हवा खेळती राहण्याचे प्रमाण वाढते. त्यामुळे, दव शोषून घेणे वाढते व उष्णता किंवा थंडी यांच्यापासून रक्षणही होते. गवताच्या आच्छादनामुळे गांडुळे आणि सूक्ष्मजीवांना अन्न मिळते आणि त्याचा उपयोग पिकांना पोषकद्रव्ययुक्त कम्पोस्ट पुरविण्यात होतो. याशिवाय, तणांची मुळे जमिनीत राहिली असल्याने ती जमिनीला धरून ठेवतात आणि जसे पृष्ठभागावर आच्छादनामुळे होते तसेच जमिनीचे सेंद्रीय आयुष्य वाढविण्यास यामुळे मदत होते. मृत मुळांचे रूप पालटते आणि ती जुनी होतात. जमिनीची सुपीकता वाढविणाऱ्या घटकांसाठी ते अन्न म्हणून उपयोगात येतात.

तण कापणे आणि आच्छादन करणे हे काम तणांना फुलोरा येणे आणि त्यांचे परागीकरण होणे या आधी करणे गरजेचे असते. यामध्ये शेतकऱ्यांना उशीर झाला आणि आच्छादनात परागीकरण झालेले तणबीज असेल तर त्याच तणांची नवी पिढी आच्छादलेल्या परिसरात पुन्हा उगवेल.

काहीच करू नये?

आधुनिक शेतीच्या तुलनेत नैसर्गिक शेतीत श्रम भरपूर कमी असले तरी नियमितपणे काळजीपूर्वक लक्ष देणे गरजेचे आहे. त्यामुळे तर म्हण पडली आहे. शेतकऱ्यांच्या पावलांचे ठसे हे पिकांसाठीचे सर्वोत्तम खत आहे! झाडांच्या बाबतीत तर सुरुवातीच्या काही वर्षांमध्ये हे अत्यंत महत्त्वाचे आहे. हळूहळू ते स्वावलंबी होतात, शेतकऱ्याचे काम कमी होते, त्यानंतर, कापणी व्यतिरिक्त काहीही करावे लागत नाही. नारळांबाबत तर भास्करभाईंनी आता कापणी करणेही सोडले आहे. नारळ पिकण्याची आणि खाली पडण्याची ते वाट बघतात आणि नंतर जमिनीवर पडलेले केवळ उचलतात!

तांदूळ, गहू, डाळी, भाज्या अशी पिके घेण्यासाठी दरवर्षी मोसमानुसार लक्ष देणे आवश्यकच असते. त्यामुळे, ही पिके घेण्याच्या त्यांच्या पद्धतीला भास्करभाई हे सेंद्रीय शेती म्हणतात. कारण, काहीच न करता होणारी शेती हे स्वरूप येण्यासाठी पुरेशी विकसित झालेली झाडे, पीक पद्धती निर्माण व्हावी लागते. मात्र, या पिकांबाबतही शेतकऱ्याचा हस्तक्षेप हा कमीतकमी असला पाहिजे, निसर्गाच्या शहाणपणाचा आदर केला पाहिजे आणि कमीतकमी हिंसा केली पाहिजे.

शेतीतील पाच महत्त्वाचे घटक

जगभरातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाच्या असलेल्या पाच घटकांसंदर्भात भास्कर सावे त्यांचा नैसर्गिक शेतीच्या अनुषंगाने व्यावहारिक पातळीवर केलेला विचारही स्पष्टपणे मांडतात. हे पाच घटक म्हणजे मशागत, सुपीकता वाढविणारे घटक, तण काढणे, सिंचन आणि पीकसंरक्षण.

मशागत

झाड पिकांबाबत मशागत ही केवळ एक वेळा केली पाहिजे आणि त्याचा उपयोग रोप लावणे किंवा बिया पेरणे ही प्रक्रिया करण्यापूर्वी जमीन मोकळी करण्यासाठी व्हावा. रोप लावल्यानंतर, सच्छिद्रता राखणे आणि जमिनीत हवा खेळती राखणे या बाबी सूक्ष्मजीवांवर, जमिनीची मशागत करणाऱ्या प्राण्यांवर आणि झाडांच्या जमिनीतील मुळांवर सोडून द्याव्या.

सुपीकतेचे घटक

जमिनीची सुपीकता कायम राखण्यासाठी पीकांचे अवशेष आणि बायोमास यांचे पुनर्चक्रीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. जिथे शेतातून मिळणारे बायोमास कमी असते, तेथे सुरुवातीला सेंद्रीय बाबी या बाहेरून टाकणे उपयोगाचे ठरते. मात्र, कोणत्याही परिस्थितीत रासायनिक खते वापरू नये.

तण काढणे

तण काढणे सुद्धा टाळले पाहिजे. पिकांपेक्षा तणांची वाढ जास्त होत असेल, ते सूर्यप्रकाश रोखत असेल, तरच ते कापून आणि त्यांचे आच्छादन करून ती वाढ रोखली पाहिजे. मात्र, त्यांना मुळापासून उपटून काढू नये. तणनाशकांचा मात्र कधीही वापर करू नये.

सिंचन

सिंचन हे गरजेपुरतेच करावे आणि त्याचा उपयोग मातीचा ओलेपणा राखण्यासाठी जितके आवश्यक आहे तितकाच व्हावा. वनस्पतींचे संपूर्ण आच्छादन - शक्यतोवर बहुस्तरीय - आणि पालापाचोळ्याने जमीन झाकण्याने पाण्याची गरज कमी होते.

पीक संरक्षण

नैसर्गिकरित्या खाणाऱ्या प्राण्यांच्या आधारे जैवनियंत्रण करण्याच्या नैसर्गिक प्रक्रियेवर हे पीक संरक्षण सोडून द्यावे. चांगल्या माती सेंद्रीय पद्धतीने वाढलेल्या, चांगल्या पिकांच्या पॉलिकल्चरमुळे कीटकांचे आक्रमण होण्यापासून मोठ्या प्रमाणात संरक्षण केले जाते. त्यातून होणारा कोणताही धोका हा कमीतकमी आणि स्वत:हून नियंत्रणात येतो. याकरिता फार तर रसायनेविरहित उपाय जसे की कडुलिंबाचा वापर, देशी गाईचे पाणी मिश्रित मूत्र, इत्यादी यांचा उपयोग करावा आणि ते देखील अगदी फारच गरज असल्यास.

अशा प्रकारे बहुतांश कामे निसर्गाकडे परत वळून केल्याने, जी कामे आधीही निसर्गाचीच होती, अर्धमेल्या आधुनिक शेतकऱ्याच्या पाठीवरील मोठे ओझे कमी होते. त्यामुळे, जमिनीचेही पुन्हा पोषण होते.

''सांस्कृतिक आणि आध्यात्मिक उत्क्रांतीचा महत्त्वाचा घटक असलेली अहिंसा ही केवळ नैसर्गिक शेतीद्वारेच साध्य केली जाऊ शकते'', सावे सांगतात, त्यांच्या मते या सगळ्याचा निष्कर्ष हा की - ''नैसर्गिक शेतीला अन्नपूर्णेचे, सर्व जीवांना भरपूर खाद्य देणाऱ्या देवीचे, वरदान आहे.''

हा लेख 'द विजन ऑफ नॅचरल फार्मिंग' या भारत मन्साता यांच्या पुस्तकातून घेतला आहे, २७७ पाने, अर्थकेअर बुक्स,

www.earthcarecooks.com

Bharat Mansata
Email:bharatmansata@yahoo.com

मराठी अनुवाद : श्री. दत्ता पाटील

Source : Bhaskar Save the Gandhi of Natural Farming
Leisa India - September, 2021